# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ११/०४/२०२४ (गुरूवार) दुपार**

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

आगामी लोकसभा निवडणुक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्रीराम नवमी शांततेत पार पडावे या अनुशंगाने पोलीस स्टेशन उमरेड यांचे वतीने आज दिनांक ११/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथुन उमरेड पोलीस तसेच रेल्वे सुरक्षा बल व होमगार्ड सैनिक असा पोलीस ताफा घेवुन उमरेड शहरातील भिसीनाता चौक, सराफा लाईन, ईतवारीपेठ मुख्य बाजार, जुना मोटार स्टॅन्ड, ढबाले विहीर, मंगळवारी पेठ, जिवन विकास चौक, नायडु बाजार, तहसिल कार्यालय परिसर ते पोस्टे परिसर असा रुटमार्च काढण्यात आला आहे. सदरचा रुट मार्च हा मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री राजा पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड यांच्या मार्गदर्शनात काढण्यात आला आहे.

तसेच आगामी लोकसभा निवडणूक व सन उत्सव संबंधाने मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर पूजा गायकवाड मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर उपविभागा मध्ये पोलीस स्टेशन बुट्टीबोरी ते प्रमुख रस्त्याने ते शिव मंदिर, शिवाजी चौक, बुटीबोरी मार्केट लाईन, एमआयडीसी चौक पर्यंत तसेच पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी येथे टाकळघाट गावामध्ये प्रमुख रस्त्याने रूट मार्च घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये पोनि. हृदय नारायण यादव पोस्टे बोरी, सपोनी राजीव कर्मलवार एमआयडीसी बोरी, आर. सी. पी. पथक व पोलीस स्टेशन बुट्टीबोरी व एमआयडीसी बटुटीबोरी येथील ०९ अधिकारी व ७१ अंमलदार व १४ सैनिक हजर होते.











पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर